# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३१४/२०१०/४१

तक्रार दाखल दिनांक :- १०/१२/२०१०
निकाल दिनांक :- ०४/०२/२०११

श्री कडुबा रायाजी खरात,
एन - ९ के. १४/१ पवन नगर,हडको,
औरंगाबाद.

(ग्राहक क्र.४९००१०५११११२४) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही. बी. मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/१२/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंनीकडुन घरगुती वापरासाठी दिनांक २४/०९/१९८५ पासुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०५१११२४ असा आहे. ग्राहकास मार्च २००५ पासुन मीटर रिडींग न घेता वीज देयके देण्यात येत होती.ग्राहकाने त्याचे देयकांचा भरणा केलेला आहे. ग्राहकास माहे जुलै २००९ मध्ये एकत्रीत ७००८ युनिट चे रुपये ५०,२६७.८३/ वीज बिल देण्यात आले. ग्राहकाने वरील वीज देयकाची विभागणी करुन देण्याबाबत व व्याज व दंडाची रक्कम कमी करण्याबाबत महावितरण कंपनीला लेखी अर्जाद्वारे दिनांक १७/०१/२०१० व २३/०३/२०१० रोजी तक्रारी दाखल केल्या आहेत.परंतु त्यांच्या तक्रारची दखल न घेता कंपनीने त्यांचा वीज पुवठा दिनांक १८/०८/२००९ रोजी कायमचा बंद केला. ग्राहकाने कंपनीचे संबंधित कार्यालयास वीज बिल दुरुस्ती करुन देण्याबाबत व विद्युत पुरवठा सुरु करण्याबाबत तक्रारी केल्या आहेत परंतु त्याच्या तक्रारीची दखल संबंधित कार्यालयाने न घेतल्या मुळे त्यांने या मंचात तक्रार दाखल करुन सुधारीत वीज बिल मीळण्याबाबत,व्याज व दंड माफ करण्याबाबत, सुधारीत वीज बिलाचे किमान १० हाप्ते करुन देण्याबाबत,व झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १०,०००/- मीळवुन देण्याबाबत मंचास विनंती केली.

२) वरील तक्रारीची सूनावणी दिनांक २१/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली होती परंतु नोडल अधिकारी सुनावणीस उपस्थित न राहील्यामुळे सुनावणीची पुढील तारीख ३०/१२/२०१० ठेवण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी यांनी जबाब सादर करण्यास मुदत देण्याची विनंती मंचास केली. मंचाने त्यांचे विनंती नुसार सुनावणीची पुढील तारीख १२/०१/२०११ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक १२/०१/२०११ रोजी झालेल्या सुनावणी वीज ग्राहक व नोडल अधिकारी उपस्थित होते नोडल अधिकारी यांनी आपला जबाब सादर करुन ग्राहकाचे वीज देयक १८ महीन्यात विभागुन देवुन रुपये १२१५९/- ची वजावट केल्याचे सांगीतले व ग्राहकास रुपये ३८१०८/- रुपयाचे वीज बिल देण्यात आले आहे व ते योग्य आहे असे प्रतिपादन केले. ग्राहकाने त्याचे वीज बिल ४८ महीन्याच्या कालावधीमध्ये विभागणी करुन दयावे व व्याज दंडाची रक्कम कमी करावी अशी विनंती मंचास केली. दोन्ही बाजुकडुनचे म्हणने ऐकुण घेतल्या नंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, सी.पी.एल.नुसार ग्राहकाचे कनेक्शन माहे मार्च २००५ मध्ये कायमचे बंद करण्यात आले असत्याची नोंद आहे. तसेच ग्राहकाने ०४/०४/२००५ रोजी रुपये २५००/- चे वीज देयक भरल्यानंतर त्याचा वीज पुरवठा सुरु करण्यात आल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकास माहे २००५ पासुन मीटर रिडींग न घेता वीज देयक देण्यात येत होते. त्याचा ग्राहकाने भरणा केलेला आहे. ग्राहकास जुन २००९ मध्ये ७००७ युनिटचे ४७४३१.७५/-चे एकत्रीत वीज देयक देण्यात आले. वरील वीज देयकाबाबत ग्राहकाने तक्रार केल्यानंतर ते १८ महीण्यात विभागणी करुन रुपये १२१५९/-चे क्रेडीट दर्शवून रुपये

३८१०८/- चे सुधारीत वीज देयक देण्यात आले. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा वीज पुरवठा मार्च २००५ मध्ये कायमचा बंद केल्यानतर ग्राहकाने तो स्वतः जोडुन घेतला त्यामुळे मार्च २००५ ते जुन २००९ या कालावधीत ग्राहकास रिडींग नुसार विद्युत देयक देण्यात आले नाही तसेच फेब्रवारी २००९ मध्ये केलेल्या तपास मोहीमेमध्ये ग्राहकाचा वीज पुरवठा सुरु असल्याचे अडळुन आले असे निवेदन केले परंतु ग्राहकाने माहे एप्रिल २००५,जानेवारी २००६ व आक्टोबर २००६ या महीन्यात वीज देयक प्राप्त झाले असुन यांचा त्याने भरणा केलेला आहे.व सी.पी.एल.नुसार ग्राहकाचा वीज पुरवठा एप्रिल २००५ पासुन सुरु असल्याची नोंद आहे. त्यामुळे नोडल अधिकारी यांचे प्रतिपादन योग्य वाटत नाही याउलट माहे एप्रिल २००५ मध्ये रुपये २५००/-चा भरणा केल्यानंतर कंपनीने त्याचा वीज पुरवठा सुरु करुन दिला परंतु त्यांना मीटर रिडींग प्रमाणे वीज देयक देण्यात आले नसल्याचे दिसुन येते. माहे जुन २००९ मध्ये मीटर रिडींग नुसार दाखविण्यात आलेले रिडींग ७९०८यूनिट आहे. त्याबाबत ग्राहकाने कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. त्यामुळे ग्राहकाने माहे एप्रिल २००५ ते १८/०८/२००९ या ५२ महीन्याच्या कालावधीत ७९०८ युनिटचा वीज वापर केला असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वरील वीज वापराचे समान विभाजन करुन त्या त्या वेळेच्या दराप्रमाणे सुधारीत वीज देयक करावे व सुधारीत वीज देयक चार समान हप्त्यामध्ये भरण्याची सवलत देण्यात यावी. ग्राहकाने वीज देयकाचा पहीला हप्ता भरल्यानंतर त्याचा वीज पुरवठा सुरु करण्यात यावा असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनी ने ग्राहकास दिलेले माहे मार्च २००५ ते जुलै २००९ या कालावधीतील वीज देयक रद्द करण्यात येत असून त्याऐवजी ग्राहकास ७९०८ युनिटचे ५२ महीन्यात समान विभाजन करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतीही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

३) वरील कालावधीत ग्राहकाने भरणा केलेल्या रक्कमेची सुधारीत वीज देयकातुन वजावट करावी.

४) वरील सुधारीत वीज देयक ४ समान हाप्त्यामध्ये भरण्याची सवलत ग्राहकास देण्यात येत आहे व प्रथम देयकाचा हाप्ता भरल्यानंतर ७ दिवसाच्या आंत वीज पुरवठा जोडुन देण्यात यावा.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |